# दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय अमरावती
## मुख्य कार्यालय,कॅम्प रोड (इर्विन चौक),अमरावती -४४४६०३

## -: शासकिय विमा कंपनीकडुन निविदा मिळणेबाबत :-

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत पगार होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बँक कर्मचारी यांचा २०२४-२०२५ करीता समुह अपघात विमा बँकेतर्फे काढावयाचा आहे. अंदाजीत ८००० ते १०००० कर्मचाऱ्यांचे वेतन बँकेच्या खात्यांमध्ये जमा होत असुन अशा कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रु.१०.०० लक्ष / रु.२०.०० लक्ष विमा संरक्षण द्यावयाचे झाल्यास अशा दोन्ही दराबाबत निविदा **दि.१८.७.२०२४** पर्यंत मुख्यालयास पाठवावी. अटी व शर्ती करीता बँकेच्या संकेत स्थळावर www.amravatidccbank.com ला भेट दयावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**दि.१०.०७.२०२४**

**अटी व शर्ती :-**

१) निविदा दाखल करणाऱ्यामध्ये IDRA मान्यता प्राप्त विमा कंपनी असावी (विमा IDRAच्या सर्व शर्ती नुसार असावा)

२) कंपनी कमीत कमी १० ते १५ वर्ष या क्षेत्रात कार्यरत असावी.

३) कंपनीवर कोणतीही कारणास्तव IDRA ने कोणतीही प्रशासकिय कारवाई केली नसावी.

४) अपघात विमा धारकाचे अपघाती निधन झाल्यास १००% विमा रक्कमेचा लाभ होईल. कायमस्वरुपी संपुर्ण अपंगत्व झाल्यास १००% विमा रक्कमेचा लाभ होईल. समुह अपघात विमा धारकाचे कायमस्वरुपी अंशत: अपंगत्व आल्यास (एक डोळा, एक हात,एक पाय १००% निकामी झाल्यास) अशा वेळी सभासदास अपघाताच्या वेळी असलेले विम्याचे रक्कमेपोटी विमा लाभ कंपनीकडुन प्राप्त होईल.

५) कंपनीकडुन मागील वर्षात कर्ज सुरक्षित विमा दाव्यांच्या ९० टक्केपेक्षा जास्तचे निराकरण केल्याचा दाखला असावा.

६) कंपनीला समुह अपघात विमा व्यवसायाचा किंवा विमा सेवेचा (किमान ७५ हजार ते १ लाख सभासदांचा विमा काढल्याबाबतचा) मागील दोन वर्षात काम केल्याचा अनुभव असावा.

७) पात्र विमा कंपन्यांनी त्यांचे सीलबंद प्रस्ताव बँकेच्या मुख्य कार्यालयात दि.१८.७.२०२४ पर्यंत सादर करावेत.

८) लाभार्थी शिक्षक व शिक्षकेत्तर / बँक कर्मचाऱ्यांकडुन बँकेचे कोणत्याही प्रकारचे कर्ज असल्यास व दुदैवी घटना घडल्यास प्रथमत: मिळणारी रक्कम ही बँकेला कर्ज खात्यात जमा होईल. त्यानंतर अर्थातच उर्वरित रक्कम असल्यास ती संबंधीताच्या बचत खात्याला जमा देता येईल.

९) अपघात विम्याचे नुतनीकरण कंपनीला दरवर्षी करुन दयावे लागेल.

१०) निविदामध्ये कोणतीही निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचा, निविदा प्रक्रिया करते वेळी कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा तसेच अटी व शर्ती मध्ये फेरबदल करण्याचा अधिकार बँकेकडे राहील.

सदर निविदा प्रक्रिया संदर्भात अधिक माहितीकरीता बँकेचे मुख्यालयाशी संपर्क करावा.

**(मोबाईल नंबर :- ८६२३००१३०७,९४२१७३९७७८)**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

B.sir/NIVIDA ९.७.२४